# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

## रामनगर सृष्टी, मिरारोड (पुर्व) ता.जि.ठाणे

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक ३२३-२२** **दिनांक २९/१०/२०२२.**

## सराईत गुन्हेगारास अटक करुन जबरी चोरी, वाहन चोरी व घरफोडीचे ०७ गुन्हे उघड. मध्यवर्ती गुन्हे शाखेची कामगिरी.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयात घरफोडी, जबरी चोरी, वाहन चोरीच्या गुन्हयात दिवसेंदिवस वाढ होत असल्याने सदर गुन्हयांना आळा घालण्यासाठी व दाखल गुन्हे उघडकीस आणण्यासाठी मा. वरिष्ठांनी सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेतील अधिकारी व अंमलदार यांचे एक विशेष पथक नेमण्यात आले होते.

सदर पथकातील स.पो.नि. दत्तात्रय सरक, पो.हवा.शिवाजी पाटील यांना सराईत गुन्हेगार वाकणपाडा, नालासोपारा (पुर्व) येथे घरफोडी, जबरी चोरी गुन्हयात चोरी केलेला मुददेमाल विक्री करण्याकरीता येणार असल्याची गुप्त बातमीदारामार्फत खात्रीलायक माहिती मिळाल्याने, मिळालेल्या गुप्त माहितीच्या अनुषंगाने वाकणपाडा, नालासोपारा (पुर्व) या परिसरात नमूद पथकाने सतत दोन दिवस सापळा रचुन दिनांक २८/१०/२०२२ रोजी मोटारसायकल वरुन येणारा इसम नामे नुरउददीन उर्फ छोटु कमरुददीन शेख, वय २२ वर्ष, राह. रेणुकानगर गल्ली, वाकणपाडा, नालासोपारा (पुर्व) यास ताब्यात घेतले. त्याच्या अंगझडतीत त्याच्याकडे सोन्याचे दागिने, ५ मोबाईल फोन व एक मोटार सायकल असा एकूण १,२५,९९०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळून आला. सदर मुद्देमालाबाबत त्याचेकडे विचारपुस करता त्याने ते चोरी केले असल्याचे सांगितल्याने, सदर मुद्देमालावरुन मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात पोलीस ठाण्यास दाखल अभिलेखावरील गुन्हयांची पाहणी केली असता सदर मुददेमाल हा खालील नमूद पेल्हार व वालीव पोलीस ठाण्यास दाखल गुन्हयातील चोरीस गेलेला मुददेमाल असल्याचे निषन्न झाले तसेच सदर इसम हा गुन्हे अभिलेखावरील सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुध्द घरफोडी व जबरी चोरीचे गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास पुढील योग्य त्या कारवाईकामी पेल्हार पोलीस स्टेशन यांचे ताब्यात देण्यात आले आहे. अशाप्रकारे नमूद आरोपीताकडुन घरफोडी चोरीचे ०२, जबरी चोरीचे ०४ व वाहन चोरीचा ०१ गुन्हा असे एकूण ०७ गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत.

### उघडकीस आलेले गुन्हे खालीलप्रमाणे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि क्रमांक व कलम |
|---|---|---|
| १. | पेल्हार पोलीस ठाणे. | गु.र.नं.९०५/२०२२भा.दं.वि.सं.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे. |
| २. | पेल्हार पोलीस ठाणे. | गु.र.नं.४६८/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ४५७, ३८० प्रमाणे. |
| ३. | पेल्हार पोलीस ठाणे. | गु.र.नं.७२५/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३९२, ३४ प्रमाणे. |
| ४. | पेल्हार पोलीस ठाणे. | गु.र.नं.७९३/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३९२, ३४ प्रमाणे. |
| ५. | वालीव पोलीस ठाणे. | गु.र.नं..२५९/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३९२, ३४ प्रमाणे. |
| ६. | वालीव पोलीस ठाणे. | गु.र.नं.९१३/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३९२, ३४ प्रमाणे. |
| ७. | पेल्हार पोलीस ठाणे. | गु.र.नं.३९३/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे. |

सदरची कामगिरी श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.नि. राहुल राख, स.पो.नि. दत्तात्रय सरक, पो.उ.नि. चंद्रकांत पोशिरकर, पो.हवा. शिवाजी पाटील, मनोहर तावरे, पो.अं. सुशील पवार, जयकुमार राठोड यांनी केलेली आहे.



------ oooo ------